बेटी बचाओ • बेटी पढाओ

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट द्वारा संचालित

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

E-mail : makm.college@gmail.com

## माहिती पुस्तिका २०१८-१९



# मनोगत

मार्च २०१८ च्या एच. एस. एस. सी. परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थीनींचे हार्दिक स्वागत. आपण या महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे निश्चित केले त्यामुळे महाविद्यालयाबद्दल आपणास माहिती असणे आवश्यक आहे.

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट द्वारा संचालित मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना हिंगणघाट सारख्या तालुक्याचे ठिकाणी २०१८ ला झाली. २०१८ – १९ हे महाविद्यालयाचे पहिलेच वर्ष आहे. हिंगणघाट तालुक्यातील व परिसरातील हुशार व अभ्यासू मुलींना त्यांचे इच्छित ध्येय गाठण्यासाठी सक्षम करुन महिला सशक्तीकरणाच्या दिशेने वाटचाल करीत संकल्प सिद्धीस नेण्यास महाविद्यालय वाटचाल करीत आहे. त्याकरीताच विद्यार्थीनींकरीता मासिक प्रवास आणि सवलत योजना, संगणक प्रशिक्षण केंद्र, वर्गखोल्यांमध्ये पंखे, एलसीडी टीव्ही, पुरेशी पिण्याच्या पाण्याची योजना, संगणकीकृत कार्यालय व ग्रंथालय, पदवीत्तर शिक्षण स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, पं.जवाहरलाल नेहरू, म.गांधी, डॉ आंबेडकर, स्वामी विवेकानंद अभ्यासकेंद्र या आणि अशा अनेक योजना प्रस्तावित असून त्यापैकी काहींचे कार्य प्रत्यक्षात सुरू झालेले आहे. ई–लर्निंगसारख्या सुविधेमुळे विद्यार्थीनींना आधुनिक पद्धतीने शिक्षण घेता येणे शक्य होणार आहे. एलसीडी टीव्ही/इंटरनेटच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थीनींपर्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती पोहविण्याची योजना येत्या काही दिवसातच पूर्णत्वास जाईल.

सर्व विद्यार्थीनींना सर्व विषयांकरीता पुरेशी बैठक व्यवस्था व तासिका उपलब्ध होण्यासाठी भविष्यात युजीसीच्या माध्यमातून स्वतंत्र इमारत प्रस्तावित आहे. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीनींना सोमवार ते शुक्रवार असे पाच दिवस ठराविक पद्धतीचा गणवेश वापरावयाचा आहे.

ग्रंथालयातील ग्रंथांची देवाणघेवाण, वर्गातील तासिकांमध्ये दृक–श्राव्य माध्यमांचा उपयोग, चर्चासत्र, शैक्षणिक सांस्कृतिक उपक्रम, विद्यार्थीनी–कर्मचारी व शिक्षकवृंद यांच्याकरीता ओळखपत्र व गणवेश त्याचप्रमाणे महाविद्यालयाची प्रवेशापासून तर परीक्षेपर्यंतची सर्व कामे नियुक्त केलेल्या समितीमार्फत होणार असल्यामुळे विद्यार्थीनी, पालक, शिक्षक व कर्मचारी यांनी यादृष्टीने महाविद्यालयीन प्रशासनास सहकार्य करावे.

आपली पाल्य भविष्यातील स्पर्धेच्या युगात परिपूर्ण पद्धतीने तयार व्हावा ही प्रत्येक पालकांची अंतरीची इच्छा असते. या महाविद्यालयात आपल्या पाल्याचा रीतसर प्रवेश घेऊन ती पूर्ण करण्याचा महाविद्यालय पूर्ण प्रयत्न करणार आहे. धन्यवाद!

**प्राचार्य**
मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, हिंगणघाट

# विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा

(रजि. क्र. महा/२०४/८५/एफ-६७०, वर्धा.)

## संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. पांडुरंगजी तुळसकर | - | अध्यक्ष |
| २) | डॉ. निलेश तुळसकर | - | उपाध्यक्ष |
| ३) | डॉ. उमेश तुळसकर | - | सचिव |
| ४) | श्री. विजयराव ईटणकर | - | सहसचिव |
| ५) | सौ. रेखा तुळसकर | - | कोषाध्यक्ष |
| ६) | श्रीमती शांताबाई तळवेकर | - | सदस्य |
| ७) | श्री. दादाजी वरभे | - | सदस्य |

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## महाविद्यालय विकास समिती २०१८-१९

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ या कायद्यातील कलम ९७ (१) च्या अंतर्गत महाविद्यालयीन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. पांडुरंगजी तुळसकर | - | पदसिद्ध अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. उमेश तुळसकर | - | व्यवस्थापन सचिव |
| ३) | प्रा. श्रुती जयस्वाल | - | अध्यापक सदस्य |
| ४) | प्रा. अभय दांडेकर | - | अध्यापक सदस्य |
| ५) | प्रा. डॉ. नयना शिरभाते | - | अध्यापक सदस्य |
| ६) | श्री. अमित रेंढे | - | अध्यापकेत्तर सदस्य |
| ७) | श्री. प्रभाकर आंबटकर | - | उद्योग सदस्य |
| ८) | श्री. विजयराव इटनकर | - | समाजसेवा सदस्य |
| ९) | डॉ. निलेश तुळसकर | - | संशोधक सदस्य |
| १०) | प्रा. डॉ. राजविलास कारमोरे | - | निमंत्रीत सदस्य |
| ११) | प्राचार्य | - | पदसिद्ध सचिव |

महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे सभापती व सचिव (विद्यार्थांच्या निवडीनुसार सदस्य घेण्यात येईल)

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## वरिष्ठ महाविद्यालय

| अ.क्र. | विद्या शाखा | तुकड्या | मंजूर विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | बी.ए भाग १ (मराठी माध्यम) | १ | १२० |
| २. | बी.कॉम भाग १ (इंग्रजी माध्यम) | १ | १२० |
| ३. | बी.एस.सी. भाग-१ (PCM-CBZ) | १ | १२० |

## वरिष्ठ महाविद्यालय (SENIOR COLLEGE)

### कला शाखा (मराठी माध्यम)

#### बी. ए. प्रथम सत्र

१. मराठी (आवश्यक)

२. इंग्रजी (आवश्यक)

ऐच्छीक विषय (खालीलपैकी कोणतेही तीन)

३. राज्यशास्त्र

४. समाजशास्त्र

५. इतिहास

६. गृह अर्थशास्त्र

#### बी. ए. द्वितीय सत्र

१. मराठी (आवश्यक)

२. इंग्रजी (आवश्यक)

ऐच्छीक विषय (खालीलपैकी कोणतेही तीन)

३. राज्यशास्त्र

४. समाजशास्त्र

५. इतिहास

६. गृह अर्थशास्त्र

### वाणिज्य शाखा (इंग्रजी माध्यम)

**बी. कॉम -१**

**First Semister**

1) Financial Accounting-I
2) Business Organization
3) Company Law
4) Business Economics-I
5) Compulsory English
6) Second Language (Marathi/Hindi)

**Second Semister**

1) Statistics and Business Mathematics
2) Business Management
3) Secretarial Practice
4) Business Economics-II
5) Compulsory English
6) Second Language (Marathi/Hindi)

## B. Sc. Sem I

### CBZ Group

1) Chemistry
   PAPER-I : Inorganic Chemistry
   PAPER-II : Physical Chemistry
   Chemistry practical
2. Botany
   PAPER-I : Viruses, Prokaryote & Algae
   PAPER-II : Fungi, Lichen, Plant-Pathology & Bryophyta
   Botany Practical
3. Zoology
   PAPER-I : Life and Diversity of Animals-Nonchordates (Protozoa to Annelida)
   PAPER-II : Environment Biology
   Zoology Practical
4. Compulsary English
5. Marathi

### PCM Group

1) Physics
   PAPER-I : Properties of Matter and Mechanics
   PAPER-II : Electrostatics, Time varying fields & Electric Currents
   Physics practical
2. Chemistry
   PAPER-I : Imorganic Chemistry
   PAPER-II : Physical Chemistry
   Chemistry Practical
3. Mathematics
   PAPER-I : Algebra and Trigonometry
   PAPER-II : Calculus
4. Compulsary English
5. Marathi

## B. Sc. Sem II

### CBZ Group

1) Chemistry
   PAPER-I : Organic Chemistry
   PAPER-II : Physical Chemistry
   Chemistry practical
2. Botany
   PAPER-I : Pteridophyta & Gymnospems
   PAPER-II : Palaeobotany & Morphology of Angiosperms Botany Practical
3. Zoology
   PAPER-I : Life and Diversity of Animals-Nonchordates (Arthropoda to Hemichordata)
   PAPER-II : Cell Biology
   Zoology Practical
4. Compulsary English
5. Marathi

### PCM Group

1) Physics
   PAPER-I : Oscillations, Kinetic theory of gases and Thermodynamics
   PAPER-II : Gravitation, Astrophysics, Magnetism and Magneto statics
   Physics practical
2. Chemistry
   PAPER-I : Organic Chemistry
   PAPER-II : Physical Chemistry
   Chemistry Practical
3. Mathematics
   PAPER-I : Geometry, Differential and Differential Equations
   PAPER-II : Vector Calculus and Improper Integrals
4. Compulsary English
5. Marathi

## सुचना :

१) पदवी स्तरावरील गृहअर्थशास्त्र, विज्ञान व वाणिज्य शाखेचे ऐच्छिक विषयांना प्रात्यक्षिक राहील.

२) सर्व विषयांच्या एक सत्र व चार घटक चाचणी परीक्षा होतील.

३) वर्गातील उपस्थित ७५% असणे आवश्यक आहे.

४) रा.से.यो. क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक, निरंतर व प्रौढ शिक्षण यामध्ये विद्यार्थीनींना १० गुणांपर्यंत बोनस गुण देण्याची व्यवस्था आहे.

५) एस.सी., एस.टी., एन.टी., एस.बी.सी., ओ.बी.सी. व अल्पसंख्याक विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीची सोय उपलब्ध आहेत.

६) बी.ए. अभ्यासक्रमाचे माध्यम मराठी व बी.एससी. व वाणिज्य या वर्गाचे माध्यम इंग्रजी आहे.

७) सर्व वर्गातील विद्यार्थीनींना प्रवेशापासून सात दिवस किंवा १५ जुलै पूर्वी ई.बी.सी./शिष्यवृत्ती/फ्रिशीप फॉर्म संबंधित लिपिकाकडे जमा करून ओळखपत्रावर फॉर्म दिल्याची नोंद व स्वाक्षरी घ्यावी. प्राचार्य, शिक्षक किंवा इतर कोणाकडेही दिलेले फॉर्म निर्धारित मुदतीत शासनाकडे न गेल्यास विद्यार्थीनींना परीक्षा फॉर्म भरतांना शिक्षण शुल्क नगदी स्वरूपात भरावे लागेल. लिपिकांची कामे आणि फी तक्ता पुढे दिलेले आहेत.

९) वरिष्ठ महाविद्यालय कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गाची वेळ –: सकाळी ०७.०० ते दुपारी ०१.०० अशी राहील.
कार्यालयीन कामकाजाची : वेळ– सकाळी ०८.०० ते दु. ०४.०० पर्यंत आणि ग्रंथालयाची वेळ–सकाळी ०८.०० ते दु. ०४.०० पर्यंत.

१०) विद्यार्थीनींशी संबंधित परीक्षा फी, शिष्यवृत्ती व इतर सवलती, अभ्यासक्रम बदल, खेळ, एन.एस.एस, प्रात्यक्षिक परीक्षा, प्रोजेक्ट रिपोर्ट, तोंडी परीक्षा इत्यादीबाबत वर्गात आणि सूचना फलकावर माहिती लावण्यात येते. अनुपस्थित विद्यार्थीनींनी याबाबत संबंधितांशी संपर्क करून माहिती घ्यावी. विहित मुदतीत या सर्व प्रक्रिया विद्यार्थीनी–पालकांनी पूर्ण न केल्यास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस विद्यार्थीनी स्वत: जबाबदार असतील.

११) शैक्षणिक सहल, अभ्यास मंडळ, चर्चा सत्र, समूह अभ्यासगट असे उपक्रम राबविले जातात. प्रत्येकाने यात सहभागी व्हावे.

१२) विद्यार्थ्यांनींनी विद्यापीठाची संकेतस्थळावरील २०१८–१९ वर्षाची अभ्यासक्रम पुस्तिका पाहावी.

१३) अभ्यासक्रमातील माहिती करीता समन्वयकांशी (CO-Ordinator) किंवा विभाग प्रमुखांशी संपर्क साधावा.

## अत्यंत महत्वाची सूचना :

सत्र २०१३–१४ पासून बी.एससी. वर्गासाठी तसेच २०१६–१७ पासून B. A. I व B. Com. I विद्यापीठाने अद्ययावत अभ्यासक्रम तयार केले असून सत्र पद्धतीनूसार (Semester Pattern) प्रवेश होणार आहेत. यामुळे विद्यार्थीनींच्या ऑक्टोंबर व एप्रिल अशा दोन सत्र परीक्षा होणार आहेत. प्रथम सत्र, द्वितीय सत्रासाठी दोन वेळा प्रवेश अर्ज/परीक्षा अर्ज करावयाचा आहेत.

## विशेष सूचना : (नियमित विद्यार्थीनींकरीता)

**विद्यापीठ परिक्षा फॉर्म भरण्याची अंतीम तारीख**

**1) Sem : I$^{st}$ : 31 Aug. 2018**

**2) Sem : II$^{nd}$ : 15 Jan. 2019**

विद्यार्थीनींनी अभ्यासक्रम (Syllabus) साठी विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.org.in या संकेतस्थळावरील माहिती पाहावी. ऐच्छिक विषयासाठी महाविद्यालयातील विभागप्रमुखांशी संपर्क साधावा. पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी सेमीस्टर पद्धतीची परीक्षापद्धती आहे. Internal Assessment साठी महाविद्यालयाकडे २० गुण आहेत. वर्गउपस्थिती, कार्यशाळा, प्रोजेक्ट, दिलेल्या वेळेच्या आत तयार करावे लागेल.

प्रथम व तृतीय सेमीस्टरसाठी विद्यार्थीनींनी स्वतंत्र प्रवेश अर्ज भरावा व प्रत्येक सेमीस्टरसाठी स्वतंत्र विद्यापीठ परीक्षा अर्ज भरावा. प्रथम सेमीस्टर प्रवेश जुलै महिण्यात व विद्यापीठ परीक्षा ऑक्टोंबर महिण्यात तर दुसरे सेमीस्टर विद्यापीठ परीक्षा एप्रिल महिण्यात होईल. तीसरे व चौथे सेमीस्टर ची परीक्षा पूढील वर्षी वरील प्रमाणेच होईल.

# COURSE NAME : ALL U.G. COURSES - 2018 - 19
## NON GRANT AIDED

| Sr. No. | Fee Type | FEE AMOUNT | | |
|---|---|---|---|---|
| | | B.A.I | B.Com.I | B.Sc.I |
| 1 | Tuition Fee | 5496 | 5496 | 7729 |
| 2 | Game & Sport Fees | 300 | 300 | 300 |
| 3 | ICard Fees | 20 | 20 | 20 |
| 4 | Library Fees | 300 | 300 | 300 |
| 5 | Extra Curricular Activities | 150 | 150 | 150 |
| 6 | Medical Exam Fees | 30 | 30 | 30 |
| 7 | Phy Eff. Test Fees | 30 | 30 | 30 |
| 8 | Student Aid Fund Fees | 100 | 100 | 100 |
| 9 | College Magazines Fees | 100 | 100 | 100 |
| 10 | Admission Fees | 100 | 100 | 100 |
| 11 | Laboratory Fees | - | - | 1029 |
| 12 | Enrolment Fees | 110 | 110 | 110 |
| 13 | Union Fees | 5 | 5 | 5 |
| 14 | Student Welfare Fees | 5 | 5 | 5 |
| 15 | Student Medical Fees | 5 | 5 | 5 |
| 16 | Ashwamegh / Indradhanush | 30 | 30 | 30 |
| 17 | Internal/College Exam Fees | 30 | 30 | 30 |
| 18 | E-Survidha | 50 | 50 | 50 |
| 19 | Annual Fees | 125 | 125 | 125 |
| 20 | Medical From | 5 | 5 | 5 |
| 21 | Medical Aid Fund | 5 | 5 | 5 |
| 22 | Games Fees | 25 | 25 | 25 |
| 23 | Student Aid Fund | 5 | 5 | 5 |
| 24 | Disaster Management Fund | 10 | 10 | 10 |
| 25 | University Development Fund | 600 | 600 | 600 |
| 26 | Maintenance Fee | 320 | 320 | 500 |
| 27 | Environment | - | - | - |
| | TOTAL | 7956 | 7956 | 11398 |

## विशेष महत्त्वाच्या सूचना

१) महाविद्यालयाचे प्रथम सत्र १६ जून २०१८ पासून सुरू होत आहे.

२) बी.ए.,बी. कॉम, बी.एससी. चे वर्ग १ जुलै २०१८ पासून नियमितपणे सुरु होतील.

३) स्थानिक व्यवस्थापन समिती आणि प्राचार्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्रात स्नेहसंमेलन होणार नाही. परंतु दोन्ही सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम, सेमिनार, सिम्पोझियम, आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, कवी संमेलन, भावगीत स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, पुष्प रचना स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, इत्यादी सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातील.

४) महाविद्यालयात विद्यार्थीनी मंडळ गठणासाठी निवडणूक घेतली जाणार नाही. परंतु विद्यापीठ निर्देशानूसार गुणवत्तेवर आधारित विद्यार्थीनी मंडळ स्थापन केले जाईल.

५) विद्यापीठ प्रतिनिधीची निवडणूक विद्यापीठ नियमानूसार होईल. विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणूकीनंतर वर्ग प्रतिनिधींचे कोणतेही कार्य राहणार नाही.

६) विद्यार्थीनी मंडळाची पूर्वीची घटना रद्द करण्यात आली आहे.

७) एखाद्या बाबीसंबंधी वाद उपस्थित झाल्यास प्राचार्याचा निर्णय अंतिम राहील.

८) महाविद्यालयाने घालून दिलेले सर्व नियम तंतोतंत पाळणे बंधनकारक राहील. त्यासाठी प्रवेश अर्जावरील प्रतिज्ञापत्रावर विद्यार्थीनी आणि पालक यांना स्वाक्षरी करावी लागेल.

९) महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीनींनी ओळखपत्र व गणवेश परिधान करणे आवश्यक आहे.

### वर्गातील उपस्थिती :

शिक्षण मंडळ व विद्यापीठाच्या नियमानूसार प्रत्येक विद्यार्थीनींची प्रत्येक विषयाची वर्गातील उपस्थिती १०० टक्के असली पाहीजे. आजार, क्रीडा स्पर्धा इ. काही अपरिहार्य कारणामुळे विद्यार्थीनी अनुपस्थित असल्यास महाविद्यालय जास्तीत जास्त २५% टक्के उपस्थितीची सूट विद्यार्थीनींना देईल. परंतु शेकडा ७५ पेक्षा कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थीनींना मात्र कोणत्याही कारणास्तव सूट मिळणार नाही. अशा विद्यार्थीनींना विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही. अनुपस्थितीबद्दल प्राचार्याकडे रीतसर अर्ज करावा. गैरहजर विद्यार्थीनींना दंड होईल.

### महाविद्यालयीन परीक्षा :

महाविद्यालय परीक्षा मंडळाने नियोजित केलेल्या तारखेनूसार शैक्षणिक संत्रात चार चाचणी व एक सत्र परीक्षा घेण्यात येईल. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थीनींना तसेच शेकडा १० पेक्षा कमी गुण मिळणाऱ्या विद्यार्थीनींना दंड द्यावा लागेल. वैद्यकीय सबबीवर परीक्षेस अनुपस्थित असणाऱ्या विद्यार्थीनींनी परीक्षेतील त्रुटी पूर्ण करून संबंधित प्राध्यापकाकडून तसा दाखला आणावा. त्या शिवायपरीक्षेतील अनुपस्थितीबद्दल दंड माफ होणार नाही.

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## विद्यापीठ परीक्षा :

विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षासंबंधिचे नियम व त्यासाठी भराव्या लागणाऱ्या आवेदन पत्रासंबंधिची सर्व माहिती सूचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येत असते. विद्यार्थीनींनी सत्र पद्धतीच्या परीक्षेसंबंधी व महाविद्यालयातील प्रवेशासंबंधी नोटीस बोर्डवरील सूचना दररोज पहाव्या.

## राष्ट्रीय सेवा योजना :

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाची राष्ट्रीय सेवा योजना १९८९-९० पासून महाविद्यालयात सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेत प्रथम वर्ष बी.ए.बी.कॉम., बी.एससी. ते अंत्य वर्ष बी.ए.बी.कॉम, बी.एससी या वर्गातील विद्यार्थीनींना सहभागी होता येईल. राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थीनींना १२० तास कार्य पूर्ण करावे लागतील. त्याचप्रमाणे श्रमसंस्कार शिबीरात सहभागी व्हावे लागेल त्या शिवाय परीक्षेला बसता येणार नाही. सहभागी विद्यार्थीनींना विद्यापीठाकडून वेगवेगळ्या उपक्रमांसाठी १० गुण दिल्या जाते.

## प्राध्यापक वर्ग :

सुविद्य आणि अनुभवी प्राध्यापक महाविद्यालयात आहे. त्यामुळे महाविद्यालयातील परीक्षांचे निकाल व इतर शैक्षणिक प्रगती समाधानकारक राहते. विद्यार्थीनींच्या सर्वांगीण विकासासाठी प्राचार्य व प्राध्यापक तत्पर असतात.

## ग्रंथालयाचे नियम :

१) वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थीनींनी बी.टी.कार्ड काढणे आवश्यक आहे. २) पुस्तक सात दिवसापर्यंत परत करावे लागेल किंवा मुदत वाढवून घ्यावी. ३) पुस्तक परत करण्यास विलंब झाल्यास ५० पैसे प्रति दिवस दंड आकारला जाईल.

४) पुस्तक हरविल्यास दुप्पट किंमत व दंड भरावा लागेल. ५) कार्ड हरविल्यास ग्रंथपालांना कळवून दुसरे कार्ड घ्यावे.

६) ग्रंथालयाविषयी काही अडचणी, सूचना, तक्रार असल्यास त्या प्रथम ग्रंथपालाकडे नोंदवाव्या.

## ओळख पत्र :

महाविद्यालयातून नव्यानेच प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थीनींजवळ स्वत: संबंधी माहिती देणारे ओळख पत्र असणे आवश्यक आहे. त्याकरीता स्वत:च्या पासपोर्ट साईज छायाचित्रासह ओळख पत्र तयार करून घ्यावे. महाविद्यालय सोडून जातांना ओळखपत्र परत करावे. प्रवेश देण्यात आल्याबरोबरच ओळखपत्र देण्यात येईल.

## सूचना फलक :

प्रवेश, शैक्षणिक शुल्क, शिष्यवृत्ती, इतर सवलती, महाविद्यालयीन परीक्षा, बोर्ड व विद्यापीठ परीक्षा, महाविद्यालयीन उपक्रम, स्पर्धा व अन्यबाबीसंबधिची पूर्ण माहिती सूचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येत असते. प्रत्येक विद्यार्थीनीने सूचना फलकाकडे नियमितपणे लक्ष देणे आवश्यक आहे. कोणत्याही गोष्टी विषयी मला माहिती नव्हती अशी सबब ऐकून घेतली जाणार नाही.

## महाविद्यालयीन शिस्त पालनासंबंधिचे महत्त्वाचे नियम :

महाविद्यालयीन विद्यार्थी जीवन संपन्न होण्यासाठी महाविद्यायीन शिस्त पालन अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने नियमांचे पालन विद्यार्थीनींनी करणे आवश्यक आहे. बेजबाबदार वर्तमाबद्दल कडक शासन होईल.

१) सर्व विद्यार्थीनींनी महाविद्यालयाच्या नियमांचे पालन करावे. सूचनेकडे सदैव लक्ष द्यावे.

२) गुरूजनांशी आणि कर्मचारी वर्गाशी विद्यार्थीनींनी आदराने वागावे.

३) महाविद्यालयीन परिसरात मोबाईल वापराची सक्त मनाई आहे.

४) महाविद्यालयातील पुस्तके, सूचनाफलक आणि इतर सर्व साधन सामुग्रीचा वापर विद्यार्थ्यांनींनी विचारपूर्वक करावा.

५) वर्गात प्राध्यापकांचा प्रवेश होण्यापूर्वी विद्यार्थीनींनी आपआपल्या जागेवर शांततेने बसावे. वर्गात किंवा वर्गाबाहेर आजुबाजुला गोंधळ करू नये.

६) वर्गात नियमितपणे हजर असावे. वर्ग सुरू असतांना परवानगीशिवाय मध्यंतरी वर्ग सोडून जावू नये.

७) रिकामा तास असल्यास विद्यार्थ्यांनींनी ग्रंथालयात शांतनेने वाचण्यात वेळ घालवावा. आजुबाजुला सुरू असलेल्या वर्गाला त्रास होणार नाही याविषयी दक्ष असावे.

८) प्राचार्याच्या परवानगीशिवाय कोणत्याही विद्यार्थीनीला कसलीही, माहिती, जाहीरात सूचना फलकावर किंवा महाविद्यालयातील परिसरात कुठेही लावता येणार नाही किंवा त्यांचे वितरण करता येणार नाही.

९) चार चाचणी परीक्षा व एक सराव परीक्षा देणे सर्वांसाठी आवश्यक आहे.

१०) अनुपस्थिती, वाईट वर्तन व परीक्षा न देणे या आधारावर विद्यार्थीनीचे नांव महाविद्यालयातून काढले जाईल.

११) Bonafied Certificate, Railway Concessions, College Leaving यासाठी विद्यार्थीनींनीसंबंधित लिपिकाकडे अर्ज करून सांगितलेल्या सूचनेनूसार ते प्रमाणपत्र घेऊन जावे.

१२) पहिल्या सत्राच्या शेवटी ७५% उपस्थिती पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती मिळणार नाही. त्यांना नियमाप्रमाणे पूर्ण सत्राचे शिक्षण शुल्क भरावे लागेल. अनुपस्थिती जास्त असणाऱ्या विद्यार्थीनींचे नांव महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

१३) विद्यार्थीनी आजारी असल्यास तसे डॉक्टरांचे प्रमाणपत्र जोडून अर्ज करणे आवश्यक आहे.

१४) ज्या गोष्टींचा उल्लेख उपनिर्दिष्ट नियमाद्वारे करण्यात आलेला नाही. त्याबाबतचे निर्णय प्राचार्याच्या संमतीवर अवलंबून राहील.

१५) महाविद्यालयाच्या कार्यालयाची : वेळ– स.८ ते दु. ४ पर्यंत व ग्रंथालयाची वेळ– स.८ ते दु. ४ अशी राहील.

१६) गुणपत्रिका, टी.सी. बोनाफाईड सर्टिफिकेट, ओळखपत्र, परीक्षा फॉर्म, शिष्यवृत्ती व इतर सवलत फॉर्म, ग्रंथालय कार्ड व पुस्तके हे विद्यार्थीनींनी स्वत: महाविद्यालयाकडून घ्यावे. मित्र किंवा इतर कोणत्याही व्यक्तीजवळ अशाबाबतीत व्यवहार केला जाणार नाही.

मुलीसंदर्भात स्वत: मुलगी किंवा तिचे आई–वडील यांच्याशिवाय कोणतेही कागदपत्र इतरांना दिले जाणार नाही. पालकांनी अशाबाबतीत स्वत:च्या ओळखीचा पुरावा द्यावा.

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## ई-शिष्यवृत्तीसाठी अत्यंत महत्त्वाच्या सुचना

१) सर्व विद्यार्थीनींनी ऑनलाईन (इंटरनेट कॅफेमधून शासनाचे नियमानुसार) शिष्यवृत्ती फॉर्म प्रवेश अर्जासोबतच भरावे. ऑनलाईन फॉर्म भरल्याची प्रिंट महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागातील लिपिकांकडेच द्यावी. त्याची पोच संबंधित लिपिकाडून घ्यावी. ऑनलाईन फॉर्मचा युजर नेम (Username) व पासवर्ड (Password) जपून ठेवावा.

२) प्रत्येक विद्यार्थीनींचे कोअर बँकीग सेवा (CBC) असणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेत स्वत:चे बँक खाते प्रवेश घेताक्षणीच काढावे. पासबुकचा दाखला, बँक खात्याची आधार लिंक केलेली पावती इ. सोबत जोडावे.

३) शिष्यवृत्ती अर्जासाठी टी. सी., गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलीयर प्रमाणपत्र, यांची झेरॉक्स व मुळ उत्पन्नाचा दाखला संबंधितलिपिकाकडे द्यावे.

४) राष्ट्रीयकृत बँक खात्याची पासबुक झेरॉक्स संबंधित लिपिकाकडे द्यावी.

५) आधार कार्डची झेरॉक्स प्रत सोबत जोडावी. अनुसूचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT)/इतर मागासवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) यांना दिली जाणारी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ऑन-लाईन झालेली आहे. त्या दृष्टीने काही मार्गदर्शक सूचना खाली नमूद केल्या आहेत.

६) राजश्री छत्रपती शाहू महाराज EBC शिष्यवृत्ती मिळणार आहे सदर शिष्यवृत्ती ऑनलाईन झालेली आहे.

१. फक्त मॅट्रीकोत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनी ऑन-लाईन शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत.

२. फक्त महाराष्ट्र बोर्डातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थीनी ऑन-लाईन शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत. इतर बोर्डातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थीनींनी जुन्या पद्धतीने अर्जभरणी करावी.

३. मॅट्रीकोत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेली विद्यार्थीनी अनुसूचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST), /विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) इतर मागासवर्ग (OBC) / विशेष मागास प्रवर्ग (SBC) प्रवर्गातील असावा.

४. शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थीनींचे कोअर बँकिंग सुविधा असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे

५. ऑनलाईन शिष्यवृत्तीसाठी (http://mahaeschol.maharashtra.gov.in) या संकतेस्थळाचा वापर करावा. यासाठी (Internate Explorer 6.0 & above) याचाच वापर करावा.

६) User Registration करतांना SSC गुणपत्रिका/बँक खाते तपशिल/जात प्रमाणपत्र तपशिल व उत्पन्नाच्या दाखल्याचा तपशील आधार कार्ड जवळ बाळगावा जणेकरून User Registration सुलभरित्या व लवकर करता येईल.

७) शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या ज्या विद्यार्थीनींच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली आहे त्यांना :
* User Registration केल्यानंतर ४८ तासात User ID password कळविण्यात येतो.
* प्रथम Login करतांना Password बदलने अपरिहार्य आहे.
* Login केल्यानंतर शिष्यवृत्ती अर्ज पूर्ण करणे आवश्यक आहे

८. SMS सुविधेसाठी, User Registration करतांना भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक देणे आवश्यक आहे.

९. शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या ज्या विद्यार्थीनींच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली नाही त्यांना User Registration केल्यानंतर लगेच शिष्यवृत्ती अर्ज भरणे अपरिहार्य आहे.

१०. शिष्यवृत्ती अर्ज भरून पूर्ण झाल्यावर त्याची एक प्रत जरूरी दस्तऐवजासोबत महाविद्यालयात सादर करावी.

११. उत्पन्न मर्यादा शिष्यवृती करिता एस.सी., एस.टी. करिता २,०००००/- लाख रुपये व ओ.बि.सी., एस.टी., एस.बि.सी. करिता १ लाख रुपये, त्यापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्याची फ्रिशिप आवेदनपत्र भरावे.

* प्रकाशक *

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## ई-शिष्यवृत्तीसाठी अत्यंत महत्त्वाच्या सुचना

१) सर्व विद्यार्थीनींनी ऑनलाईन (इंटरनेट कॅफेमधून शासनाचे नियमानुसार) शिष्यवृत्ती फॉर्म प्रवेश अर्जासोबतच भरावे. ऑनलाईन फॉर्म भरल्याची प्रिंट महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागातील लिपिकांकडेच द्यावी. त्याची पोच संबंधित लिपिकाडून घ्यावी. ऑनलाईन फॉर्मचा युजर नेम (Username) व पासवर्ड (Password) जपून ठेवावा.

२) प्रत्येक विद्यार्थीनींचे कोअर बँकीग सेवा (CBC) असणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेत स्वत:चे बँक खाते प्रवेश घेताक्षणीच काढावे. पासबुकचा दाखला, बँक खात्याची आधार लिंक केलेली पावती इ. सोबत जोडावे.

३) शिष्यवृत्ती अर्जासाठी टी. सी., गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलीयर प्रमाणपत्र, यांची झेरॉक्स व मुळ उत्पन्नाचा दाखला संबंधितलिपिकाकडे द्यावे.

४) राष्ट्रीयकृत बँक खात्याची पासबुक झेरॉक्स संबंधित लिपिकाकडे द्यावी.

५) आधार कार्डची झेरॉक्स प्रत सोबत जोडावी. अनुसूचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT)/इतर मागासवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) यांना दिली जाणारी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ऑन-लाईन झालेली आहे. त्या दृष्टीने काही मार्गदर्शक सूचना खाली नमूद केल्या आहेत.

६) राजश्री छत्रपती शाहू महाराज EBC शिष्यवृती मिळणार आहे सदर शिष्यवृती ऑनलाईन झालेली आहे.

---

१. फक्त मॅट्रीकोत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनी ऑन-लाईन शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत.

२. फक्त महाराष्ट्र बोर्डातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थीनी ऑन-लाईन शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत. इतर बोर्डातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थीनींनी जुन्या पद्धतीने अर्जभरणी करावी.

३. मॅट्रीकोत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेली विद्यार्थीनी अनुसूचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST), /विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) इतर मागासवर्ग (OBC) / विशेष मागास प्रवर्ग (SBC) प्रवर्गातील असावा.

४. शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थीनींचे कोअर बँकिंग सुविधा असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे

५. ऑनलाईन शिष्यवृत्तीसाठी (http://mahaeschol.maharashtra.gov.in) या संकतेस्थळाचा वापर करावा. यासाठी (Internate Explorer 6.0 & above) याचाच वापर करावा.

६) User Registration करतांना SSC गुणपत्रिका/बँक खाते तपशिल/जात प्रमाणपत्र तपशिल व उत्पन्नाच्या दाखल्याचा तपशील आधार कार्ड जवळ बाळगावा जणेकरून User Registration सुलभरित्या व लवकर करता येईल.

७) शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या ज्या विद्यार्थीनींच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली आहे त्यांना :
* User Registration केल्यानंतर ४८ तासात User ID password कळविण्यात येतो.
* प्रथम Login करतांना Password बदलने अपरिहार्य आहे.
* Login केल्यानंतर शिष्यवृत्ती अर्ज पूर्ण करणे आवश्यक आहे

८. SMS सुविधेसाठी, User Registration करतांना भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक देणे आवश्यक आहे.

९. शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या ज्या विद्यार्थीनींच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली नाही त्यांना User Registration केल्यानंतर लगेच शिष्यवृत्ती अर्ज भरणे अपरिहार्य आहे.

१०. शिष्यवृत्ती अर्ज भरून पूर्ण झाल्यावर त्याची एक प्रत जरूरी दस्तऐवजासोबत महाविद्यालयात सादर करावी.

११. उत्पन्न मर्यादा शिष्यवृती करिता एस.सी., एस.टी. करिता २,०००००/- लाख रुपये व ओ.बि.सी., एस.टी., एस.बि.सी. करिता १ लाख रुपये, त्यापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्याची फ्रिशिप आवेदनपत्र भरावे.


* प्रकाशक *

प्रा.डॉ. उमेश तुळसकर

सचिव

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट



''हिंगणघाट क्षेत्रातील मुलींना शिक्षणाच्या
प्रवाहात आणून तळागाळापर्यंत
उच्च शिक्षणाची गंगोत्री पोहचवून
महिला सक्षमिकरणाच्या दिशेने टाकलेले
पाऊल पुर्णत्वास जाण्याचा संकल्प आणि
त्याच उद्धेशाने प्रेरीत होवून केलेला
हा यशस्वी प्रयत्न'

....... पांडुरंग तुळसकर

## मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयीन विविध शाखा

**कला शाखा**
(B.A.)
(मराठी माध्यम)

**वाणिज्य शाखा**
(B.Com)
(इंग्रजी माध्यम)

**विज्ञान शाखा**
(B.Sc.)

संस्थेद्वारे चालविण्यात येणारे विविध शाळा व महाविद्यालय –

१. विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर
२. विद्या विकास हायस्कुल, हिंगणघाट
३. मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट